# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

क्र/नोटीस/ ११०७/२०२५

दि. ०७/०८/२०२५

## सूचना

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून वसूल करावयाच्या अनामत रकमेच्या कमाल मर्यादेबाबत...

वाचा : १)प्राधिकरणाचे दि.२८/०८/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.
२)प्राधिकरणाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची नियमावली दि.०९/१०/२०२४.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय/उच्च व तंत्रशिक्षण /विधी /कृषी या विभागांतर्गत प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांकडून वसूल करावयाच्या अनामत रकमेची कमाल मर्यादा प्राधिकरणाचे दि.२८/०८/२०२४ चे बैठकीचे इतिवृत्तात त्याचप्रमाणे दि.०९/१०/२०२४ रोजी प्राधिकरणाकडून निर्गमित केलेली शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या नियमावलीत ठरवून देण्यात आली आहे.

तसेच सदर अनामत रक्कम एकदाच घ्यायची असून वेगवेगळ्या नावाखाली अनामत रकमेची वसूली करण्यात येवू नये अशा सक्त सूचना प्राधिकरणाच्या आहेत याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

यासंदर्भात सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान प्राधिकरणाने अनामत रक्कम (Caution money) बाबत केलेल्या नियमांनुसार कमाल मर्यादेच्या अधिन राहून विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम वसूल करावी तसेच सदर अनामत रक्कम ही परतावा योग्य असून विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर सदर अनामत रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना परत करण्यात यावी.

प्राधिकरणाचे दि.२८/०८/२०२४ चे इतिवृत्तामध्ये वसतिगृह आणि मेस या सुविधा विद्यार्थ्यांना वैकल्पिक स्वरुपात देण्यात याव्यात याबाबत विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत. याकडे संस्थांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

C:FRA_Complaint25/Letter

शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
महाराष्ट्र राज्य

संबंधित संस्था अधिनियम २०१५ मधील कलम १४(५) च्या तरतुदींनुसार विद्यार्थ्यांकडून एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करणार नाहीत.

यासंदर्भात विद्यार्थी पालक यांचेकडून कोणतीही तक्रार प्राधिकरणास प्राप्त झाल्यास व अधिनियम २०१५ च्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य

**डॉ.अर्जुन चिखले भा.प्र.से.**
**सदस्य सचिव,**
**शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.**

C:FRA_Complaint25/Letter